



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com






वर्ष २ रे | अंक : ६४७. वा | बुधवार | दि. १० जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# बुलढाणा महसूल विभागाला आयुक्त कार्यालयाचा दणका...

## भ्रष्टाचारी मंडळ अधिकारी सह त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासाठी पाठवले स्मरणपत्र...

**जनसंचलन/बुलढाणा**

महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार संपवण्यात बुलढाण्याचे अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून आल्याने आता महसूल आयुक्त कार्यालयाचे प्रशासन सक्रिय झाले असून, बुलढाण्याचे भ्रष्टाचारी तहसीलदार यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी बुलढाणा यांना महसूल उपायुक्तांनी पुन्हा एकदा फर्मान सोडले आहे. उपायुक्तांनी दिलेले पत्र हे स्मरणपत्र म्हणून दिलेले आहे. त्यामुळे बुलढाण्याचे जिल्हाधिकारी आतातरी कारवाई करतील, असा प्रश्न उपस्थित होत आहे. येथील महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याला सातत्याने महसूल विभागाचे अधिकारी टाळाटाळ तर करीतच आहे, परंतु टेकाळे यांना साथ देणारे बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे यांनाही सातत्याने वाचवण्याचा प्रयत्न महसूलचे अधिकारी करीत आहेत. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने यावर सातत्याने प्रकाश टाकला आहे की, बुलढाण्याचे तहसीलदार रूपेश खंडारे हे महाभ्रष्टाचारी विजय टेकाळे यांना वाचवण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाऊन मदत करीत आहेत. ज्या काळात टेकाळे यांची विभागीय चौकशी सुरू होती, त्या वेळी टेकाळे यांनी स्वतःला वाचवण्यासाठी त्यांच्या व नातेवाईकांच्या नावावर असलेली जमीन ही त्यांनी बक्षीस पत्र करून विविध लोकांच्या नावे केली. याशिवाय टेकाळेंच्या चौकशीचे वरिष्ठांचे आदेश असतानाही आणि टेकाळे यांचा भ्रष्टाचार दिसत असून देखील तहसीलदार रुपेश खंडारे यांनी सातत्याने टेकाळे यांची बाजू उचलून धरणारा अहवालच वरिष्ठांना पाठवला.

> **दैनिक जनसंचलनचा महसूलविभागातील भ्रष्टाचाऱ्यांना दणका**
>
> **महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांची भ्रष्टाचारात साथ देणाऱ्या तहसीलदार रुपेश खंडारे यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाईसंदर्भात थेट आयुक्त कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांना स्मरणपत्र. दैनिक जनसंचलनच्या पाठपुराव्याला यश.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन चा एकच निर्धार भ्रष्टाचाऱ्यांवर वार,भ्रष्टाचाऱ्यांना वाचवणाऱ्यांवर प्रहार**

तहसीलदार खंडारे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६ च्या ४२ (ब), ४२ (क) व ४२ (ड) या कलमाअंतर्गत मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्याशी संगनमत करून कृषक सनद देण्याचे आदेश पारित केले. या प्रकारातून खरे तर रुपेश खंडारे यांनी एक प्रकारचा गंभीर अपराध केलेला आहे. खंडारे यांचा हा अपराध त्यांना निलंबित किंवा तत्सम पुढील कारवाईस पात्र आहे. असे असताना देखील बुलढाणा महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी सातत्याने भ्रष्टाचारी खंडारे व टेकाळे यांना वाचवण्यासाठी आटापीटा केलेला दिसतो.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ला यासंदर्भात सविस्तर माहिती प्राप्त झाल्यानंतर ती सुरवातीला महसूलच्या स्थानिक वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाईची अपेक्षा होती. परंतु तेथे कोणतीही कारवाई न झाल्यामुळे महसूल आयुक्त कार्यालय अमरावती यांच्याकडे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली होती. या माहितीच्या आधारावर अमरावती महसूल आयुक्त कार्यालयात कार्यरत उपायुक्तांनी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी एक पत्र पाठवून यासंदर्भात रुपेश खंडारे यांची चौकशी करणे व योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले. मात्र, बुलढाण्याचे महसूल अधिकारी हे इतके लाचार झाले आहेत की, ते टेकाळे व खंडारे यांच्यासारख्या भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी स्वतःच्याच अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आहे. गेल्या महिनाभरात यासंदर्भात जिल्हाधिकारी किरण पाटील किंवा त्यांच्या खाली असलेल्या एकाही अधिकाऱ्याने उपायुक्तांच्या आदेशानुसार खंडारे किंवा टेकाळे यांची चौकशी केलेली नाही. त्यानंतर पुन्हा एकदा दैनिक जनसंचलनकडून महसूल आयुक्त कार्यालयात पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर आता परत एकदा महसूल उपायुक्तांनी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना स्मरणपत्र पाठवले असून, यासंदर्भात लवकरात लवकर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. उपायुक्तांकडून तहसीलदार खंडारे यांच्या चौकशीचे आदेश आल्यानंतर बुलढाण्याचे महसूल प्रशासन ढिम्म राहिल्याने आता शंका-कुशंकांना मोठा वाव मिळतो आहे. बुलढाण्याचे अख्खे प्रशासन



मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे

तर टेकाळे व खंडारे यांच्या भ्रष्टाचारात सामिल नाही ना, असा भलामोठा प्रश्न उपस्थित होत आहे. टेकाळे किंवा खंडारे यांना वाचवणाचा प्रयत्न करणारा तो झारीतील शुक्राचार्य असलेला महसूलचा अधिकारी कोण, याचा उलगडा होणे गरजेचे आहे. उपायुक्तांकडून अशाप्रकारचे स्मरणपत्र मिळणे, ही खरेतर जिल्हाधिकाऱ्यांसाठीही लाजीरवाणी बाब आहे. यातून विद्यमान जिल्हाधिकाऱ्यांची निष्क्रियता देखील पाझरताना दिसून येत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी कमीत कमीत आता या स्मरण पत्रानंतर तरी तात्काळ यासंदर्भात कारवाई करावी, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांनी करायला हरकत नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडून लोणार सरोवराची पाहणी...

**जनसंचलन/बुलडाणा**

केंद्रीय वन, पर्यावरण आणि जलवायु परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव यांनी जिल्हादौ-यावर आले असता, लोणार सरोवर परिसराची पाहणी केली. आमदार संजय गायकवाड, आमदार श्रीमती श्वेताताई महाले यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय वन मंत्री भूपेंद्र यादव यांनी येथील सरोवर संवर्धन, परिसरातील जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजना, त्यासाठी लागणारा निधी याबाबत आढावा घेतला. तसेच उल्कापातामुळे खाऱ्या पाण्याच्या सरोवराची निर्मिती झाली असून, सरोवर आणि परिसराचे तसेच येथील पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने पुरातत्व विभाग, वन विभाग आणि प्रशासनाने संयुक्तपणे आढावा घेण्याच्या सूचना दिल्या.

लोणार सरोवराच्या जतन व संवर्धनासाठी स्थानिक प्रशासनाने संबंधित विभागासोबत समन्वय ठेवून लक्ष देण्याच्या सूचना दिल्या. येथील विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले असल्यामुळे तसेच परिसरातील हजारो वर्षापूर्वीच्या दैत्यसुदन मंदिर, कमळजा देवी मंदिर, महादेव मंदिर, गोमुख आदि मंदिरांच्या संवर्धनासाठी त्यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या.

लोणार सरोवर हे पाणथळ स्थळ असून, या भागात अतिक्रमण होणार नाही, वस्त्यांमधील सांडपाणी आणि दूषित पाण्यामुळे सरोवराचे प्रदूषणापासून संरक्षण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# बालिकेच्या ताब्यासाठी संपर्क करण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

बाल कल्याण समितीच्या आदेशाने सखी नामक बालिकेचे पुर्वसन करण्यासाठी दत्तक विधान मुक्त करणे आवश्यक आहे. या बालिकेच्या ताब्यासाठी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आल आहे. बालिका नामे सखी ही दि. ५ जानेवारी २०२३ रोजी बाल कल्याण समितीच्या आदेशाने यशोधाम, दी लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड (इंडिया), बुलडाणा येथे दाखल झाली आहे. सदर बालिकेची आई कुसुम वामन लकडे, रा. सव, हिला वैद्यकिय मंडळाने ५० टक्के कायमस्वरुपी दिव्यांग प्रमाणपत्र दिले आहे. सद्यस्थितीत सदर महिला ही सेवा संकल्प प्रतिष्ठान, पळसखेड सपकाळ, ता. चिखली येथे आश्रयाला आहे. सदर बालिका अद्यापपर्यंत यशोधाम, दि लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड (इंडिया), बुलडाणा येथे दाखल आहे. बालिकेला विचारण्यासाठी, तसेच बालिकेचे कोणीही नातेवाईक सांभाळण्यासाठी किंवा ताबा घेण्यासाठी आलेले नाहीत. त्यामुळे सदर बालिकेला बाल कल्याण समिती कडुन पुनर्वसनासाठी दत्तक विधान मुक्त करण्यासाठी विधीमुक्त करणे आवश्यक आहे. बालकाचे कोणीही रक्त संबंधातील नातेवाईक असल्यास त्यांनी ३० दिवसाच्या आत यशोधाम, दि लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड (इंडिया), बुलडाणा, खामगाव रोड, सेंट जोसेफ स्कुलजवळ, सुंदरखेड, बुलडाणा, ता. बुलडाणा, जि. बुलडाणा या संस्थेस संपर्क साधावा, तसेच मोबाईल क्रमांक ९५५२२०६५०३ सामाजिक कार्यकर्ता रामेश्वर जाधव यांच्याशी संपर्क साधा-वा, असे आवाहान जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.

# मानव जिवीतास प्राणघातक नायलॉन मांजावर बुलडाणा जिल्ह्यात कायमस्वरूपी बंदी...

**जनसंचलन/बुलढाणा**



मकरसंक्रांती सण आणि इतर वेळेस पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्याची निर्मिती, विक्री, साठवणूक आणि वापर करण्यास संपूर्ण जिल्ह्यात कायमस्वरुपी बंदी घालण्यात आली आहे. दोन पतंगांमध्ये दोऱ्याचे घर्षण होवून मोठ्या प्रमाणात मांजा तुटुन उंच झाडे आणि इमारतीमध्ये मांजा अडकतो. त्यामुळे वनपक्ष्यांच्या जिवीतास धोका निर्माण होवून पशू-पक्षी जखमी, मृत होतात. पतंगासह तुटलेल्या नायलॉन मांजाच्या धाग्याचे तुकडे जमिनीवर पडुन त्याचे विघटन होण्यासारखे नसल्याने गटारे आणि नदी-नाल्यासारख्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण करतात. गाय अथवा तत्सम प्राण्यांनी नायलॉन मांजाचे तुकडे समाविष्ट असलेले खाद्य सेवन केल्यामुळे गुदमरण्याचा त्रास होतो. अशाप्रकारे मांजा, धाग्यांमधील प्लास्टिकच्या वस्तूंमुळे विविध प्रकारचे दुष्परिणाम होतात. प्लास्टिक किंवा कृत्रिम वस्तूंचा वापर करुन बनविण्यात आलेल्या आणि सर्वसाधारण नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्यामुळे पक्षी आणि मानव जिवीतास इजा पोहोचते. काही वेळा या इजा प्राणघातक ठरतात, त्यामुळे पतंग उडवण्याच्या नायलॉन मांजा, धाग्यामुळे होणाऱ्या प्राणघ-ातक इजांपासून पक्षी आणि मानवाच्या जिवीताचे संरक्षण करण्यासाठी नायलॉन मांजाची साठवणुक, विक्री, निर्मिती व वापर करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६चे कलम ५ व उपद्बोतात नमूद शासन पत्र दि. १८ जून २०१६ मध्ये नमूद केल्यानुसार आदेश पारीत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणुकदार यांना नायलॉन मांजाची विक्री आणि साठवणूक करण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस विभागांनी स्वतंत्ररित्या पथके तयार करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. आदेशाचे कोणतीही व्यक्ती, संस्था यांनी उल्लंघन केल्यास सदर बाब ही पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम १५ अन्वये शिक्षेस पात्र राहणार आहे.असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील निर्वाह भत्याचे वितरण

## निर्वाह भत्या व्यतिरिक्त रक्कम जमा करण्याचे आवाहन



**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र शासनाने अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. या योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची ६० टक्के हिश्याची रक्कम महाडीबीटी प्रणा-लीद्वारे विद्यार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. रक्कम जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्ताची रक्कम वजा करुन उर्वरीत शिक्षण, परीक्षा आणि इतर शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास सात दिवसांच्या आत जमा करावी लागणार आहे. गेल्या काही दिवसांपासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची सन २०२१-२२ व २०२२-२३ वर्षातील केंद्र शासनाची ६० टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. करीता ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अशी रक्कम जमा झाली अथवा काही दिवसात जमा होणार आहे, अशा विद्यार्थ्यांनी त्या रकमेमधून निर्वाह भत्याची ६० टक्के रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम महाविद्यालयात जमा करावी, याबाबत संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील, असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# रक्तदान शिबिरातून समाजसेवेचा वसा जपणाऱ्या समाधान देशमुख यांचा रक्त मित्र म्हणून सन्मान...

**जनसंचलन / सिंदखेडराजा**

मागील अनेक वर्षांपासून निःस्वार्थ भावनेतून निरंतर व अविश्रांत सामाजिक कार्य करीत असलेल्या पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते समाधान देशमुख यांच्या कार्याची दखल घेत जालना ब्लड बँकेच्या वतीने रक्त मित्र पुरस्कार देऊन त्यांना पत्रकार दिनी सन्मानित करण्यात आले. समाधान देशमुख हे गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिते बरोबरच सामाजिक कार्यातून सदैव गोरगरीबांच्या सेवेसाठी धडपडत असतात त्यांनी इतर सामाजिक कार्यासोबतच असंख्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करुन रक्तदानासारख्या सामाजिक कार्याचा वसा अविरत चालू ठेवलेला असून जालना ब्लड बँकेच्या माध्यमातून गरजु लोकांना माफक व थॅलेसेमीया ग्रस्त बालकांना निःशुल्क रक्त घटक मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतात.यासाठी त्यांनी ऐच्छिक रक्तदात्यांचा एक मोठा परिवार उभा केला असून गरजवंताला रात्री बेरात्री रक्त घटक मिळवून देण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. समाधान देशमुख हे वर्षभर महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, धार्मिक उत्सव,सामाजिक उपक्रम, सामाजिक तथा राजकीय नेत्यांचे वाढदिवस विविध प्रतिष्ठानांचे वर्धापन दिन अशा वेगवेगळ्या प्रसंगी ते रक्तदान शिबिरांचे आयोजन करीत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत जालना ब्लड बँकेच्या वतीने देण्यात



येणारा रक्त मित्र पुरस्कार देऊन त्यांना पत्रकार दिनी सन्मानित करण्यात आले. समाधान देशमुख हे एक उत्कृष्ट पत्रकार असून त्यांचे सामाजिक कार्यातील योगदान मोठे आहे त्यांच्या या कार्याची दखल घेत पत्रकार दिनाचे औचित्य साधून त्यांना रक्त मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.संपुर्ण जगभरामध्ये ऐच्छिक व पात्र रक्तदात्यांची संख्या रक्त मागणीच्या तुलनेत फारच कमी आहे त्यामुळे अशी रक्त मित्रांची एक फळी निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

# उमरद ग्रामपंचायत च्या वतीने सत्काराचे आयोजन...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील उमरद ग्रामपंचायत च्या वतीने ग्रामपंचायत कर्मचारी संजय मुळे यांची पदोन्नती झाल्यामुळे ग्रामपंचायत च्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच निर्मला पंढरी होत्या, तर प्रमुख उपस्थिती आनंदी शिनगारे, प्रभाकर देशमुख, पंढरी उबाळे, अरुण घायवट, दत्तू सानप, जालिंदर गिरी, संतोष गिरी, राजू शिनगारे, गोविंद मुळे, विठ्ठल भांबर्गे, यांच्यासह ग्रामसेवक विनोद सातपुते हजर होते, यावेळी ग्रामसेवक विनोद सातपुते आणि उपस्थित यांना मार्गदर्शन केले तर संजय मुळे यांनी अनेक कठीण परिस्थितीमध्ये तोंड देऊन परिस्थितीवर मात करून, आपल्या संसाराचा गाडा ओढला, परंतु आज निश्चित त्यांची प्रगती होणार आहे, व्यसनापासून सदैव दूर राहणे, आणि आपल्या अधिकाऱ्यांनी सांगितलेले काम वेळेत पूर्ण करणे, तसेच आपल्या वृद्ध आई ची काळजी घेणे असे त्यांना बजावून सांगितले

यावेळी ग्रामसेवक सातपुते यांनी गेली तीन वर्षे गावाला चांगल्या प्रकारे सेवा दिली म्हणून त्यांचा सुद्धा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी संतोष गिरी, बाळासाहेब जाधव यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले, कार्यक्रमाला सखाराम गिरी, नरसिंग सोसे, गणेश मुळे, यांच्यासह अनेक गावकरी हजर होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय साहेबराव मुळे, देविदास खजुरे, गोवींद मुळेविजय मुंडे, सखाराम बोडखे, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रभाकर राजे देशमुख यांनी केले

# दुकानाचे नामफलक मराठीत आवश्यक

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रत्येक दुकानाचे नामफलक सुरवातीला मराठीत नाव असणे अनिवार्य असल्याची तरतूद महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व दुकानांचे नामफलक मराठीत असणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ७ नुसार सर्व आस्थापनांना कलम ३६ क (१), कलम ६ नुसार नोंदणी केलेल्या प्रत्येक आस्थापनेत दहापेक्षा अधिक कामगार आहेत, अशा सर्व आस्थापनेचे नामफलक देवनागरी लिपीतील मराठी भाषेमध्ये असावे. परंतु अशा आस्थापनेच्या नियोक्त्याकडील देवनागरी लिपीतील मराठी भाषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेतील व लिपीतील नामफलक देखील असू शकतील. मराठी भाषेतील अक्षरलेखन, नाम फलकावर सुरवातीला लिहिणे आवश्यक आहे. मराठी भाषेतील अक्षराचा टंक आकार, इतर कोणत्याही भाषेतील अक्षराचा टंक आकारापेक्षा लहान असणार नाही. तसेच ज्या आस्थापनांमध्ये मद्य पुरविले जाते किंवा विकले जाते, अशी आस्थापना नाम फलकावर महान व्यक्तींची किंवा गड-किल्ल्यांची नावे लिहिणार नाही. याबाबत शासनाने दि. १७ मार्च २०२२ रोजी अधिनियमात सुधारणा केली आहे. जिल्ह्यातील सर्व आस्थापना मालकांनी याचे तंतोतंत पालन करावे, या तरतुदीचा भंग करणाऱ्या आस्थापना मालकाविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी आ. शि. राठोड यांनी केले आहे.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२२-२३

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य शासनाच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. यासाठी दि. २२ जानेवारी २०२४ पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. क्रीडा विभागातर्फे राज्यातील क्रीडापटू आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिंकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली २०२३ची नियमावली विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२२-२३ या वर्षाच्या पुरस्कारासाठी दि. २२ जानेवारी २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे. पुरस्काराकरीता राज्यातील ज्येष्ठ क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू आणि साहसी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करणाऱ्या इच्छूक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम आणि दिव्यांग खेळाडू यांनी विहीत मुदतीत क्रीडा विभागाच्या या संकेतस्थळावरील स्क्रोलिंग लिंकमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर दि. ८ ते २२ जानेवारी २०२४ पर्यंत फक्त ऑनलाईन अर्ज सादर करता येईल. या क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# शुक्रवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा रूग्णालयात नियमितपणे दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र शुक्रवार, दि. १२ जानेवारी २०२४ रोजी रोजी स्थानिक सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालयात नियमित शुक्रवारी मतिमंद, मनोरूग्ण, कान, नाक, घसा व नेत्र संबंधित दिव्यांग बोर्ड सुरू असते. मात्र बुधवार, दि. १२ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे या दिवसाचे




दिव्यांग तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

# स्व. बाबा आमटे स्मृती राज्यस्तरीय समाजसेवा गौरव पुरस्कार २०२० सुरज यादव यांना

**जनसंचलन/ खामगाव**

येथील रहिवासी एकनिष्ठा गौ - सेवा रक्तसेवा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष श्री. सुरज यादव यांनी कोरोना काळात जेव्हा कोणी घराच्या बाहेर निघायला हिम्मत करत नव्हता त्यावेळी आपल्या जिवाची पर्वा न करता गौ - सेवा रुग्णसेवा, रक्तसेवा, अन्नसेवा आपल्या एकनिष्ठा फाउंडेशन मित्र मंडळीच्या सहकार्याने सेवा केलेली होती या कार्याची दखल श्री गुरुदेव सेवा मंडळ चांदुरबिस्वा ता. नांदुरा जि. बुलढाणा यांनी घेत तर्फे स्व. बाबा आमटे स्मृती राज्यस्तरीय समाज सेवा गौरव पुरस्कार २०२० सन्मान पत्र स्मृती चिन्ह व शॉल देऊन सम्मानित करण्यात आले आता पर्यंत केलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा तसेच सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा गौरव व्हावा या उद्देशाने तसेच राष्ट्रसंतांचे कार्य आपण हातून प्रबळ व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन श्री गुरुदेव सेवा मंडळ, चांदुरबिस्वाचा स्वर्गीय बाबा आमटे स्मृती राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्कार २०२० ने सुरज यादव यांना गौरविण्यात आले. हा पुरस्कार दिनांक ८-०१-२०२४ रोजी डाक पार्सल करून सुरज यादव राहणार सतीफैल खामगांव यांच्याकडे पोस्टाने सुपुर्द करण्यात आला व तसेच पुढील वाटचालीस प्रा. किशोर अशोकराव



जाधव समिती प्रमुख व श्री प्रदीप महादेवराव तांदुळकर सदस्य सचिव चांदुरबिस्वा यांनी शुभेच्छा दिल्या.

# संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष, नार्वेकरांच्या निर्णयाची प्रतीक्षा...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या प्रकरणातील आणखी एक टप्पा आता विधानसभा अध्यक्षांच्या निकालानंतर पार होणार आहे. महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाला खऱ्या अर्थानं दीड वर्षापूर्वी म्हणजेच जून २०२२ मध्ये सुरुवात झाली. एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेतील काही आमदार सूरतला निघून गेले. त्याच्यानंतर ते आमदार गुवाहाटीला पोहोचले. या दरम्यान उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना पक्षाचे व्हीप असलेल्या सुनील प्रभू यांनी आमदारांची बैठक बोलावली. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी व्हीप जारी करण्यात आला होता. त्या व्हीपचं पालन न केल्यामुळं शिवसेनेकडून १६ आमदारांच्या निलंबनाच्या याचिका तत्कालीन विधानसभा अध्यक्ष म्हणून काम पाहणारे नरहरी झिरवाळ यांच्याकडे सादर केल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या मे २०२३ मधील निकालानंतर ही जबाबदारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर आली. सुप्रीम कोर्टानं राहुल नार्वेकर यांना रिजनेबल टाइममध्ये आमदार अपात्रतेचा निर्णय घेण्यास सांगितलं होतं. त्यानंतरच्या न्यायालयीन संघर्षानंतर आता अखेर आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल जाहीर होणार आहे. सुप्रीम कोर्टानं महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या प्रकरणावर निकाल देताना आमदार अपात्रतेचा अधिकार अध्यक्षांचा आहे म्हणत त्यांच्यावर ती जबाबदारी सोपवली होती. सुप्रीम कोर्टानं त्यासाठी काही मार्गदर्शक सूचना देखील जारी केल्या होत्या. मे २०२३ मधील निकालानंतर आमदार अपात्रता प्रकरणाचा निर्णय घेण्याचे अधिकार राहुल नार्वेकर यांना मिळाले होते.विधानसभा अध्यक्षांच्या आमदार अपात्रता प्रकरणातील कार्यवाहीवर सर्वोच्च न्यायालयानं देखील नाराजी व्यक्त केली होती. अखेर न्यायालयातील लढाईनंतर सुप्रीम कोर्टानं राहुल नार्वेकर यांना शिवसेनेच्या १६ आमदारांच्या निलंबनाचा निर्णय ३१ डिसेंबरपूर्वी घेण्यात यावा, अशा सूचना दिल्या. राहुल नार्वेकर यांनी निकालाचं



लेखन करण्यासाठी म्हणून वेळ वाढवून १० जानेवारी घेतला. आता त्या प्रमाणं राहुल नार्वेकर आमदार अपात्रता प्रकरणात काय निर्णय देतात याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.

# मोर्चात आमच्या वाढलेल्या संख्येमुळे सर्वांना आरक्षण मिळणार...

## मोर्चात ओबीसी समाज नाही तर ओबीसी नेते आडवे येत आहे मनोज जरांगे पाटील यांचे वक्तव्य...

**वृत्तसंस्था/जालना**

अजित पवार यापुढे मराठा आरक्षणाच्या विरोधात बोलले तर त्यांचा वेगळा विषय हाती घ्यावा लागेल. तुम्ही तुमच्या ज्ञानाचा ग्रंथ लिहा पण मराठा आरक्षणाबाबत बोलायचं नाही, असा इशारा जरांगे पाटलांनी अजित पवारांना दिला आहे. गोदाकाठच्या १२३ गावांच्या संवाद दौऱ्याचा पहिला टप्पा आटोपून जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे पोहचले. त्यानंतर ते आज पत्रकारांशी बोलत होते. पहिल्यापेक्षा या दौऱ्यात लोकांचा पाठिंबा वाढला आहे. जास्त दिवस झाल्यानंतर आंदोलनाची धार कमी होते पण या दौऱ्यात लोकांचा पाठिंबा वाढलेला दिसून आला, असं जरांगे पाटील म्हणाले आहेत. मोर्चात आमच्या वाढलेल्या संख्येमुळे सर्वांना आरक्षण मिळणार आहे. अंतरवालीपासून मोर्चात मराठा बांधवांची संख्या कमी असेल. पण पुण्यापासून वाढेल. प्रशासन मोर्चात सहभागी होणाऱ्या लोकांचा आकडा काढत आहे. पण त्यांचाही आकडा चुकेल, असा दावाही त्यांनी केला. आमच्या मुंबई मोर्चात ओबीसी समाज नाही तर ओबीसी नेते आडवे येत आहे. ही त्यांची जुनीच सवय असल्याचा टोला जरांगे यांनी ओबीसी नेत्यांना हाणला आहे.राज्य मागासवर्ग आयोगाला सूचना करण्याइतपत आपण मोठे नाही. पण त्यांच्या कामांची माहिती आम्ही घेत आहोत. त्यांनी सर्वेक्षणासाठी जे प्रश्न निवडले आहेत, ते सर्व समाजासाठी असायला हवेत, अशी मागणीही जरांगे यांनी केली आहे.



ब्राम्हण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी फडणवीस यांना पत्र देणार असल्याचे जरांगे यांनी म्हटलं आहे.

# दुसरबीड परिसरात अवैध वृक्षतोड जोमात अधिकारी कोमात...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील परिसरामध्ये असलेले चांगेफळ सोनोशी जवळका पिंपळगाव कुडा ताडशिवनी केशव शिवनी खैरव मलकापूर पांगरा तसेच खडकपूर्णा नदी शेजारी गावा लगत असलेल्या चंदन सागवान निंब बाभूळ काटशेवर याची झाडे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असून मात्र याकडे संबंधित अधिकारीच दुर्लक्ष करीत असल्याने दिवसाढवळ्या अवैद्य वृक्षतोड जोरात सुरु आहे. एकीकडे शासन वृक्ष लावा वृक्ष जगवा याची घोषणा करत आहे लाखो रुपये खर्च करून वृक्ष लागवड केली जाते. मात्र परिसरातील ठेकेदाराकडून अनेक ठिकाणी विनापरवानी वृक्षाची कत्तल होत आहे. यामध्ये सिंदखेड राजा तालुक्यातील सागवान साठी प्रसिद्ध असलेले दुसरबीड येथे सागवानाचे साहित्य मोठ्या प्रमाणात विकले जाते त्यामध्ये प्रामुख्याने घराचे दरवाजे सोफासेट टीपॉय पलंग चोकट येथे छोट्या मशीनद्वारे कटाई करून विकल्या जाते. त्यांच्या जवळ कोणताच अधिकृत परवाना नसून सिदखेडराजा तालुक्यामध्ये विनापरवानगी छोट्या मशीनी द्वारे कटाई सुरू आहे ज्यांच्याकडे परवानगी नाही त्यांच्यावर कारवाई होणार का? असा खडा सवाल उपस्थित झाला असून तपासणी महत्वाची ठरणार आहे काही मशिन धारकाजवळ कोणताच परवाना नसून गोरख धंदा राजरोसपणे सुरू आहे त्यांना विचारले असताआमच्याकडे सागवान परवानगी घेऊनच कटई केली जाते. तसेच दुसरबीड परिसरामध्ये चंदनाच्या झाडाची सुद्धा मोठ्या प्रमाणात चोरी सुरू आहे याकडे सुद्धा वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली असून त्वरित याऽेद्य वृक्षतोडीवर लगाम लावण्यात यावा अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे



बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| 8x8 cm (Width 8 cm, Hight 8 cm) | 5x8 cm (Width 8 cm, Hight 5 cm) | 5x8 cm (Width 23 cm, Hight 5 cm) |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Size | Rate |
|---|---|
| Width 12 cm, Hight 12 cm | 2600/- |
| Width 10 cm, Hight 8 cm | 1800/- |
| Width 8 cm, Hight 8 cm | 1300/- |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com